# कृषि पर्यटन : एक उत्तम शेतीपूरक व्यवसाय

डॉ. नेहा काळे
प्राचार्य
विस्तार शिक्षण विभाग
रो. श. कृषि महाविद्यालय, नेसरी, कोल्हापुर

सविता ढोके
आचार्य पदवी विद्यार्थिनी
विस्तार शिक्षण विभाग
व.ना.म.कृ.वि., परभणी

डॉ. अतुल मुरारी
प्राचार्य
विस्तार शिक्षण विभाग
कृषि महाविद्यालय, आमखेडा, वाशिम

पर्यटन विषयाला सध्या प्रचंड मागणी आहे. जगभरातील उंचावणारी उत्पन्न मर्यादा, विविध देशांबद्दल, जागांबद्दल आणि माणसांबद्दल माणसाला असलेली मूलभूत उत्सुकता आणि धकाधकीच्या जीवनाची गरज म्हणून लोकांचा पर्यटनाकडे ओढा वाढत आहे. त्यामुळे व्यवसाय म्हणून पर्यटनाचे महत्त्वही वाढत आहे. यातूनच एका संकल्पनेने जन्म घेतला, त्याला 'एक्स्पिरिअन्स टुरिझम' म्हणजे 'अनुभवात्मक पर्यटन' म्हणतात. एखाद्या जागी फक्त जाऊन येण्यापेक्षा तिकडचे जीवन, पद्धती प्रत्यक्षात अनुभवण्याकडे पर्यटकांचा ओढा आहे. माणूस हा खेड्यातून शहराकडे गेला आहे. आज बहुतांश शहरी कमावणारा गट शहरातच जन्मलेला असला तरी आपले आजोबा, खापरपणजोबा कसे जीवन जगायचे हे त्याला अनुभवायला आवडते. ज्यांना गाव नाही त्यांना गावातील जीवन पाहायला आवडते. यातूनच कृषी पर्यटनाची क्रेझ निर्माण झाली आहे. ती ओसरणार नाहीच. त्यामुळे कृषी पर्यटन व्यावसायिक म्हणून आपण काय देतोय यावर आपल्याकडे पर्यटकांचा ओघ कसा असेल हे अवलंबून आहे. अतिशय सुंदर आणि आव्हानात्मक व्यवसाय-कृषी पर्यटन!

गावातील तरूणांनी आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग करून गावात राहून गावाचा विकास करण्याची ही उत्तम संधी आहे. त्यासाठी अनेक उद्योग व्यवसाय आहेत. या उद्योगापैकी एक म्हणजे कृषी पर्यटन शेतीपूरक व्यवसाय होय. देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात कृषी पर्यटनाला सुरूवाती झाली. राज्यात दर वर्षी शेकडो कृषी पर्यटन केंद्र उभे राहत आहेत. अनेक कृषी पर्यटन केंद्र यशस्वीपणे चालू आहेत. राज्यातील काही कृषी पर्यटन केंद्रांना भारतातील ग्रामीण संस्कृती समजून घेण्यासाठी विदेशी पर्यटक भेट देतात. ग्रामीण व शहरी संस्कृतीचा संगम म्हणजे कृषी पर्यटन होय.



### कृषी पर्यटन म्हणजे काय?

कृषी पर्यटन म्हणजे आपल्या शेतात शहरी पर्यटकांना बोलवून शेती आणि गावाची संस्कृती प्रत्यक्षात दाखवणे. शिवार फेरीच्या माध्यमातून शेती कशी पिकवली जाते. कशी केली जाते. विविध पिके, फळांची माहिती शहरी पर्यटकांना आपल्या पद्धीतने सांगणे. शेतकरी शेत पिकविण्यासाठी कधी काय, कसा आणि कोणासाठी मेहनत घेतो. याची प्रत्यक्ष माहिती देणे. कृषि पर्यटन हा शहरी पर्यटक आणि ग्रामीण शेतकरी यांना आर्थिकदृष्ट्या जोडणारा एक शेतीपूरक व्यवसाय आहे. लोकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देण्याबरोबरच गावातील शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न, रोजगार मिळून देण्याचा दृष्टीकोन या उपक्रमामागे आहे.

१६ मे हा जागतिक कृषि पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रामध्ये आजमितीला ६०० ते ७०० कृषि पर्यटन केंद्रे आहेत. कृषी पर्यटन केंद्र केरळ सारख्या निसर्ग संपन्न भागापासून राजस्थान सारख्या वाळवंटी भागापर्यंत सुरू करू शकतो. म्हणून निसर्ग दुष्काळापेक्षा विचारांची दुष्काळ दूर होणे महत्वाचे आहे. कृषी पर्यटन प्रकल्पाच्या परिसरात डोंगर, तलाव, धरण, वनराई, जंगल, नदी, समुद्र असावा असे अजिबात नाही. मराठवाड्यात अनेक कृषी पर्यटन केंद्र आहेत. स्थानिक संस्कृतीचा प्रतिबिबं त्या कृषी पर्यटनात दिसला पाहिजे.

### कृषि पर्यटनाचा उद्देश:

- कृषि पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून राज्याचा विकास साधने हे कृषि पर्यटनचे ब्रीद वाक्य आहे.
- कृषि पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध देणे.
- शेती मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे.
- शहरी पर्यटकांना ग्रामीण जीवनाचे, लोककला आणि परंपरा यांचे दर्शन घडवणे.
- कृषि व ग्रामीण संस्कृतीला चालना देणे.
- महाराष्ट्र कृषि व ग्रामीण पर्यटन समिती स्थापन करणे.
- त्यांना शेती कामाविषयी माहिती करून देणे तसेच शेतीत प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव देणे.
- कृषि पर्यटकांना शांत प्रदूषणमुक्त निसर्गाच्या सानिध्यात राहण्याचा अनुभव देणे.
- ग्रामीण भागातील पडीक, गायराण, क्षारपड जमिनी वावराखाली आणणे.

### कृषि पर्यटन कोण सुरू करू शकते?

राज्यातील शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय आणि शहरी नागरिकांना पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी राज्यात कृषि पर्यटन धोरण राबवण्यास सप्टेंबर २०२० मध्ये मंजूरी देण्यात आली. त्यानुसार शेतकरी, शेतकऱ्याच्या कृषि सहकारी संस्था, कृषि विज्ञान केंद्र, कृषि महाविद्यालये, कृषि विद्यापिठे, शेतकऱ्यांच्या भागीदारी संथा आणि कंपन्या, सेंद्रिय शेती करणारा शेतकरी कृषि पर्यटन केंद्र उभारू शकतात.

महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटन हे पर्यटनातील नवीन चेहरा म्हणून उदयास आले आहे. या बाबतीत जागृती होत असून कृषी पर्यटनाच्या विकासासाठी इच्छूक शेतकऱ्यांसह राज्य शासनाकडून ठोस पाऊले उचलली जात आहेत.

### कृषि पर्यटन केंद्राची संकल्पना कशी असावी

१. कुठल्याही व्यवसायाची पहिली गरज म्हणजे आपले मार्केट काय आहे ते समजणे. ते समजले की त्यांच्या गरजा समजू शकतात. कृषी पर्यटक हा शहरात राहणारा किंवा अगदी विदेशातील एखादा पर्यटक आहे. त्याला गावातील निर्मळ वातावरणाचा अनुभव घ्यायचा आहे. आपले मार्केटिंग असे असावे की जास्तीत जास्त लोकांपर्यंत/पर्यटकांपर्यंत पोहोचू शकेल.

२. कृषि पर्यटन हा शेतीपूरक आणि पर्यावरण पूरक व्यवसाय असावा. साधारण शहरापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात असावा. कृषि पर्यटन केंद्र उभारण्यासाठी मोठ्या भांडवलाची गरज नसते. एक एकर एवढ्या कमी जागेत निसर्गपूरक कृषि पर्यटन केंद्र उभारले जाऊ शकते. केंद्राच्या ठिकाणी शेती संबंधित अवजारे, ग्रामीण वस्तु पर्यटकांना पाहण्यासाठी ठेवाव्यात त्यांना त्याविषयी माहिती द्यावी. अर्थात ती सरळ रेषेत असावी असे नाही. या जागेचा वापर शेतीसाठी नाही तर शेती सदृश्य परिस्थिती निर्माण करण्यासाठी करायचा आहे. जागा उंचसखल असली किंवा डोंगराळ असली तरीही कल्पकतेने त्याचा वापर केला जाऊ शकतो. किंवा स्वत:चे शेत त्याआधीच असेल तरी हरकत नाही.

३. राहण्याच्या खोल्या कौलारू घरांसारख्या दिसणे अधिक उत्तम. बाहेरील बांधकाम विटांचे किंवा कुडाचे, बांबू, ताटी यासारख्या वस्तु वापरुन खोल्या बांधाव्यात. त्यांच्या मागणीनुसार त्यांना तंबू किवा मचाण यासारख्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करावी.



४. पर्यटकांना घरगुती पद्धतीने अस्सल गावरण आणि स्थानिक खाद्यपदार्थ उपलब्ध करून द्यावेत.

५. जागेचे विभाजन करून थोड्या भागात निरनिराळी पिके, थोड्या भागात भाज्या, औषधी वनस्पती आणि फळझाडांची लागवड करावी. त्यामुळे शेतातील ताजा माल जेवणाला वापरता येतो आणि पर्यटक ताजा माल खरेदी करू शकतात. जागा तत्सम असेल तर बऱ्यापैकी मोठी शेती करता येते. थोड्या भागात गोड्या पाण्यातील मत्स्यशेती आणि थोड्या जागेत कुक्कुटपालन करता येते. दुग्धव्यवसाय आणि शेळीपालन यामध्ये शेणाची किंवा विष्ठेची घाण निर्माण होत असल्याने पर्यटकांच्या राहण्याच्या जागेपासून लांब करावी. किंवा हे सर्व प्रकार न करता संपूर्ण जागेवर फक्त फुलशेती सुद्धा करू शकतो. पाश्चात्त्य देशात लांबच लांब पसरलेल्या झेंडूच्या किंवा गुलाबाच्या फुलांच्या बागा असतात. त्यामुळे ती जागा खूप सुंदर दिसते.

६. पर्यटकांना हेतुतू, विटीदांडू, लगोरी यासारख्या ग्रामीण खेळांची माहिती करून देणे व ते खेळ त्यांना खेळायला शिकवणे. याशिवाय पर्यटकांना केंद्राच्या आसपासच्या परिसरातील पर्यटन केंद्रही दाखववीत.

७. पर्यटकांना मनोरंजनासाठी लेजिम, जागरण गोंधळ, वासुदेव, गारुड्याचा खेळ, डोंबाऱ्याचा खेळ, आदिवासी नृत्य यासारख्या ग्रामीण आणि पारंपरिक मनोरंजन कार्यक्रमाची व्यवस्था करून द्यावी. जेणेकरून त्या स्थानिक कलाकारांनाही रोजगार मिळेल व ग्रामीण लोककलेचेही संवर्धन होईल. ग्रामीण भागातील शेती, निसर्ग, पशू-पक्षी, संस्कृती आणि जीवनशैली याचे शहरी भागातील लोकांना आकर्षण वाटू लागले आहे. त्यामुळे विरंगुळा किवा क्षणभर विश्रांती म्हणून लोक आता ग्रामीण भागाकडे पर्यटन केंद्र म्हणून पाहू लागले आहेत.

८. जंगल पर्यटन: जर जागा डोंगराळ किंवा डोंगराच्या जवळ असेल, तर वर उल्लेख केलेल्यांपेक्षा अतिशय वेगळे असे जंगल पर्यटन करू शकतो. यात फक्त पर्यटकांना जंगलात आल्याचा फील द्यायचा आहे. त्यामुळे बांबू, खैर असे मोठे मोठे वृक्ष लावावे. त्याचबरोबर औषधी वनस्पतींची लागवड करावी. बांबू तीन वर्षात प्रचंड प्रमाणात उत्पादन देतात. त्यामुळे तो फायदेशीर वृक्ष आहे. याचबरोबर ससे, हरिण असे प्राणी पाळता येतील जेणेकरून जंगलाचा फील येईल. एखाद्या ठिकाणी कृत्रिम धबधबा तयार करू शकतो. मात्र एका गोष्टीची काळजी घ्यावी की पर्यटकांना कुठेही भीती वाटणार नाही.

### विशेष घ्यायची काळजी:

हा व्यवसाय अतिशय जोखमीचा व्यवसाय आहे. कारण यात तुमच्या पर्यटकांची जबाबदारी आणि काळजी केंद्रावर असते. त्यामुळे अनेक गोष्टीची काळजी घेण्याची गरज असते. कृषी पर्यटनात विशेष घ्यायची काळजी म्हणजे पर्यटकांची सुरक्षितता. पर्यटकांना कधीही असुरक्षित किंवा भीती वाटणे हा धोक्याचा इशारा आहे.

गावातील आयुष्यातील शांतता, निरागसता आणि वेळेच्या मागे न धावणारी जीवनपद्धती याचा त्यांना पुरेपूर आनंद घेऊ द्या.

### उत्पन्न आणि खर्चाचा मेळ:

पर्यटक संख्येवर पर्यटनाच्या केंद्राचा नफा अवलंबून असतो. दोन रात्री, तीन दिवसांचे पॅकेज ठेऊ शकतो. तुमचे केंद्र कुठे आहे आणि जेथून मुख्य पर्यटक येऊ शकतात उदा मुंबई, पुणे, औरंगाबाद येथून ते किती लांब आहे यावर तुम्ही किती दिवसांचे पॅकेज ठेवावेत हे अवलंबून आहे. पर्यटकांचा केंद्रापर्यंत येण्याचा वेळ, केंद्रातून परत घरी जाण्याचा वेळ, साधारणत: त्यांना कामावर सुट्टी घ्यावी लागेल का याचा अंदाज, पर्यटनाचा कालावधी, तुमच्या केंद्राभोवती असणारी पर्यटनस्थळे यावर पॅकेज किती दिवसांचे असावे हे अवलंबून आहे.

कृषी पर्यटन हा एकमेव असा शेतीपूरक व्यवसाय आहे यातून शेतीचा आणि गावाचा विकास होतो. नगदी व्यवसाय व सर्वसमावेशक सामुदायिक प्रकल्प आहे. लोकसहभाग किंवा काही गटाच्या माध्यमातून देशातील कोणत्याही गावात कृषी व ग्रामीण पर्यटन प्रकल्प करू शकतो. त्यासाठी तरूणांचा पुढाकार महत्वाचा आहे. स्थलांतर थांबवू शकतो. अशाप्रकारे कृषि पर्यटनातून शहरी लोकांचा ग्रामीण जीवन, संस्कृती, शेती आणि निसर्ग यांच्याशी जोडण्याची संधी कृषि पर्यटनामुळे मिळत आहे. तर ग्रामीण भागातील लोकांना गावातच रोजगाराच्या आणि आर्थिक उत्पन्न वाढवण्याच्या संधी कृषि पर्यटनातून मिळते.

(संपर्क: +९१ ८२०८८२६९४२)

★ ★ ★

## अंजीर लागवड

व्यापारी दृष्टीने अंजीराची लागवड फक्त महाराष्ट्रातच केली जाते. सध्या महाराष्ट्रात एकूण ४१७ हेक्टर क्षेत्र अंजीर लागवडीखाली असून त्यापैकी ३१२ हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र एकट्या पूणे जिल्हयात आहे. सातारा व पूणे जिल्हयाच्या शिवेवरील नीरा नदीच्या खो-यातील खेड-शिवारापासून जेजूरीपर्यंतचा (पुरंदर – सासवड तालुका) १०-१२ गावांचा परिसर हाच महाराष्ट्रातील अंजीर उत्पादनाचा प्रमुख भाग होय. औरंगाबादजवळील दौलताबाद भाग, नाशिक आणि पूर्ण खानदेश जिल्हयात या फळझाडाची थोडीफार लागवड होते. अंजीर हे कमी पाण्यावर येणारे काटक फळझाड आहे. अलिकडे सोलापूर-उस्मानाबाद येथे अंजीराची लागवड शेतकरी करू लागले आहेत. त्यावरुन अंजीर हे सर्व दुष्काळी भागात उत्तम होईल असे म्हणायला हरकत नाही. अंजीर हे पोषणदृष्टया पौष्टीक फळ आहे. तसेच ते औषधी आहे. ताज्या अंजीरात १०-२८ टक्के साखर असते. चुना, लोह व अ आणि क जीवनसत्वे यांचा उत्महाराष्ट्रम पुरवठा होतो. अंजीर हे सौम्य रेचक असून शक्तीवर्धक, पित्तनाशक व रक्तशुध्दी करणारे असल्यामुळे इतर फळांपेक्षा अधिक मौल्यवान समजले जाते. दम्यावरही त्याचा अतिशय उपयोग होतो.

**हवामान:** उष्ण व कोरडे हवामान अंजिराला चांगले मानवते. त्यामुळे महाराष्ट्रात हे फळ आणखी मोठया क्षेत्रात करायला भरपूर वाव आहे. कमी उष्णतापमान या पिकाला घातक ठरत नाही. ओलसर दमट हवामान मात्र निश्चितपणे घातक ठरते. विशेषत: कमी पावसाच्या भागात जिथे ऑक्टोबर ते मार्चपर्यंत पाण्याची थोडीफार सोय आहे अशा ठिकाणी अंजिर लागवडीस वाव आहे.

**जमिन:** अगदी हलक्या माळरानापासून मध्यम काळया व तांबडया जमिनीपर्यंत अंजीर लागवड शक्य आहे. भरपूर चुनखडी असलेल्या तांबूस काळया जमिनीत अंजीर उत्तम वाढते. चांगला निचरा असलेली एक मीटर पर्यंत खोल असलेली कसदार जमीन अंजीरासाठी उत्तम होय. मात्र या जमिनीत चुन्याचे प्रमाण असावे. खूप काळया मातीची जमिन या फळझाडाला अयोग्य असते. खोलगट आणि निचरा नसलेल्या जमिनीत हे झाड पाहिजे तसे चांगले वाढत नाही.

सुधारित जाती: सिमरना, कालिमिरना, कडोटा, काबूल, मार्सेल्स, (व्हाईट सान पेट्रो) आदी जाती प्रसिध्द आहेत. पुणे भागातील पुना अंजीर नावाने प्रसिध्द असलेली जात (ऍड्रिऍटिक) किंवा कॉमन या प्रकारातील असून महाराष्ट्रात मुख्यत: हीच जात लावली जाते.

**अभिवृध्दी किंवा रोप तयार करणे:** अंजिराची अभिवृध्दी फाटे कलमाने केली जाते. खात्रीच्या बागायतदाराच्या रोगमुक्त बागेतील जोमदार वाढीची झाडे निवडून नंतर त्यातून दर्जेदार फळे देणारी झाडे निवडावीत व अशा झाडावरील १.२५ सेमी जाडीच्या आठ ते बारा महिने फांदया कलमासाठी निवडतात. लावण्यासाठी फाटे करताना फांदीच्या तळाचा भाग व शेंड्याकडील कोवळा भाग छाटून टाकावा व मधला भाग रोपे तयार करण्यासाठी वापरावा. फाटे कलम तीस ते चाळीस सेमी लांब असावेत. त्यावर किमान चार ते सहा फूगीर व निरोगी डोळे असावेत. कलमांचा तळाचा काप डोळयाच्या काही खाली घ्यावा आणि वरचा काप डोळयाच्या वर अर्धा सेमी जागा सोडून घ्यावा. दोन्ही काप गोलाकार घ्यावेत. फाटे कलम गादी वाफयावर ३० × ३० सेमी वर किंवा दोन डोळे मातीत जातील अशी लावावीत. कलमे किंचीत तिरिपी करावीत. लावण्यापूर्वी कलमाच्या बुडांना आय.बी.जे. किंवा सिरेडिक्स यासारखे एखादे मूळ फोडणारे संजीवक लावले तर मुळया लवकर फूटतात.

(उर्वरित पान क्रमांक १६ वर...)